# महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.कृशिप्र-१३२१/प्र.क्र. /केंप्रप्र/जावेप्र/मुदतवाढ/२०२१/2079 दिनांक : ०७/१२/२०२१.

## महत्वाची सूचना

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अंतर्गत प्रवेश प्रक्रियेसंदर्भात कृषि व कृषि संलग्न पदवी अभ्यासक्रमांच्या उमेदवार, महाविद्यालये / संस्था यांच्याकरीता........**

संदर्भ - शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१८८/तांशि-४, दिनांक ०७ डिसेंबर, २०२१.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कृषि शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या कृषि व कृषि संलग्न पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी EWS, NCL आणि CVC/ TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी पावती सादर केली होती, **अशा सर्व उमेदवारांना संबंधीत अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम फेरीत त्या त्या राखीव प्रवर्गातून त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार जागा वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच द्वितीय व तृतीय फेरीत सुध्दा त्या त्या राखीव प्रवर्गातून जागा वाटप करण्यात येतील.** अशा उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत ज्या प्रवर्गातून जागा वाटप करण्यात आलेली आहे त्या त्या प्रवर्गातून EWS, NCL आणि CVC/ TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी विहित मुदतीत ऑनलाईन अपलोड केलेल्या पावतीच्या आधारे महाविद्यालयात प्रवेश निश्चित करण्यात येईल. सदरचा प्रवेश हा तात्पुरता प्रवेश म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**संबंधित अभ्यासक्रमांकरीता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार, ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्यांमध्ये (पहिली, दुसरी आणि तिसरी प्रवेश वाटप फेरी) प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारांनी दिनांक २०/१२/२०२१ ते दिनांक २२/१२/२०२१ या कालावधीत संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे (EWS, NCL आणि CVC/ TVC) सादर करणे बंधनकारक राहील.** जे उमेदवार संबंधित मूळ प्रमाणपत्रे सादर करणार नाहीत अशा तिन्ही प्रवेश वाटप फेऱ्यांद्वारे महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश निश्चित केलेल्या उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतील. असे उमेदवार जागेवरील प्रवेश फेरीसाठी किमान गुणवत्तेच्या पात्रतेनुसार खुल्या प्रवर्गातून प्रवेश घेण्यास पात्र राहतील, याची सर्व उमेदवार व इतर संबंधितांनी नोंद घ्यावी.

**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

D:\AGRI 2021-22\CAP\CVC Extend Notice.docx